पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १४५**
(सभावृत्तांत)

**दिनांक – ३०/१०/२०१९** **वेळ – दुपारी ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा **बुधवार दि.३०/१०/२०१९** रोजी दुपारी **०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.मडिगेरी विलास हनुमंतराव – सभापती**
२. मा.लांडगे राजेंद्र किसनराव

याशिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.सभापती –** सभा कामकाज सुरु करतेवेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसलेने दि.**३०/१०/२०१९** (**दुपारी ०२.३० वा.**) (**कार्यपत्रिका क्रमांक १४५**) ची मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार दि.**०६/११/२०१९** रोजी दुपारी **०२.१५** वा. पर्यंत तहकुब करणेत येत आहे.

**(मडिगेरी विलास हनुमंतराव)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १४५**

(सभावृत्तांत)

**दिनांक – ०६/११/२०१९** **वेळ – दुपारी ०२.१५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **तहकूब** सभा **बुधवार दि.०६/११/२०१९** रोजी दुपारी **०२.१५** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.मडिगेरी विलास हनुमंतराव – सभापती**
२. मा.गावडे राजेंद्र तानाजी
३. मा.ममता विनायक गायकवाड
४. मा.करुणा शेखर चिंचवडे
५. मा.लोंढे नम्रता योगेश
६. मा.गीता सुशिल मंचरकर
७. मा.चोंधे आरती सुरेश
८. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
९. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
१०. मा.कलाटे राहुल तानाजी
११. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

या शिवाय मा.पाटील – अति.आयुक्त(१), मा.पवार – अति.आयुक्त(२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखा परिक्षक, मा.पवार - उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे – मुख्य लेखाधिकारी, मा.तुपे, मा.निकम, मा.भालकर – सह शहर अभियंता, मा.सवणे – प्र.सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.लोणकर, मा.बोदडे - सहाय्यक आयुक्त, मा.दांगट – प्र.सहाय्यक आयुक्त, मा.साळुंके - मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील - प्राचार्य, औ.प्र.कैंद्र, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्रथमिक शिक्षण), मा.मुंढे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.गट्टूवार, मा.पुजारी, मा.भोसले, मा.पाटील, मा.घुबे, मा.देशमुख, मा.राणे, मा.वाघुंडे, मा.पोरेड्डी - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे - पशुवैद्यकीय अधिकारी, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.वस्ते, मा.बहुरे – प्रशासन अधिकारी, मा.गोफणे – आरोग्य अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक - ५७९१ विषय क्रमांक – ०१

दिनांक – ०६/११/२०१९

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.सुजाता पालांडे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

विषय - मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.१० दि.२६/०८/२०१९

विषय क्र.१ चा विचार दि.२०/११/२०१९ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५७९२ विषय क्रमांक – ०२

दिनांक – ०६/११/२०१९ विभाग – ई क्षेत्रीय, स्थापत्य

सूचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे कडील पत्र क्र.ईक्षे/स्था/कावि/९३४/२०१९ दि.१८/१०/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सल्लागार पॅनेलवर मा.स्थायी समिती ठराव क्र.२१३९, दि.०७/०२/२०१८ अन्वये मे.आकार अभिनव यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रभाग क्र.७ च-होली येथील हिरामाता पुल, खडकवासला वस्ती ते ९०.०० मी पर्यंतचा ३० मी डि.पी. रस्ता विकसित करणे. (निविदा क्र.६६/९/२०१७/१८) या कामावर तज्ञ सल्लागार म्हणून मे.आकार अभिनव यांची नेमणुक करणेत आली होती. तथापि कन्सलटंट मे.आकार अभिनव यांनी कामाचे अंदाजपत्रक तयार करताना प्रत्यक्ष स्थळपाहणी केलेली नाही. तसेच कामात केलेल्या हलगर्जीपणामुळे मे.आकार अभिनव यांचेकडून खुलासा मागविणेत आलेला होता. परंतु सदरचा खुलासा समाधानकारक नसल्याने मे.आकार अभिनव यांना पॅनेलवरुन काढून टाकणेत आलेले आहे. तथापि सदर कामाच्या निविदा पश्चात कामासाठी मे. सल्लागार यांची नेमणुक करणेची आवश्यकता असल्याने या क्षेत्रामधील अनुभवी सक्षम प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणे योग्य होईल असे मत आहे. सदर कामासाठी सल्लागार नेमणुकीसाठी संदर्भिय पत्रान्वये दिनांक १६/९/२०१९ ते दिनांक २३/०९/२०१९ या कालावधीमध्ये विविध संस्थेचे सील बंद पाकीट दर मागविणेत आले होते. त्यानुसार मे.अँशुअर्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांचेकडून १.४९% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. त्यांनी यापूर्वी देखील अशा प्रकारची कामे केलेली आहेत व सध्या काही कामे प्रगतीपथावर आहेत. त्यांनी मनपाला आतापर्यंत वेळोवेळी आवश्यक मागणीनुसार सेवा दिलेली आहे. त्यानुसार तांत्रिकदृष्ट्या कामावरून प्रत्यक्ष जागेवर नियोजित वेळेत अंमलबजावणी होणेचे दृष्टीने मे.अँशुअर्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांची सदर कामाकरिता प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करून त्याकामी लागणारी फी ही मा.स्थायी समितीच्या मान्य ठरावापेक्षा कमी दराने (१.४९%) प्राप्त झालेली आहे. तरी प्राप्त झालेल्या दरानुसार सदर कामाकरिता एकूण १.४९% निविदापश्चात (Post Tender Activity) या दराने फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५७९३ विषय क्रमांक – ०३

दिनांक – ०६/११/२०१९ विभाग – नगरसचिव

सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.नगरसचिव यांचे कडील पत्र क्र.नस/१/कावि/१५२८/२०१९ दि.२४/१०/२०१९

मा.नगरसचिव यांनी शिफारस केले प्रमाणे –

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(मडिगेरी विलास हनुमंतराव)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/१३८७/२०१९
दिनांक – ०६/११/२०१९

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.